चाणक्य मंडल परिवार

**प्रश्नपुस्तिका क्रमांक CMPT000**

**BOOKLET No.**

**प्रश्नपुस्तिका**

**एकूण प्रश्न : 50**

**वेळ : 1 (एक) तास**

# प्राचीन भारताचा इतिहास - 2

**एकूण गुण : 100**

## सूचना

(1) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

(2) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

(3) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनात बॉलपेनने लिहावा.

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे.**

(5) **ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत.

(8) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील''.**

(9) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे.

*****

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

चाणक्य मंडल परिवार

1. खालीलपैकी कोणता स्तंभ शिलालेख शुंग राजघराण्याचा इतिहास समजून घेण्यास मदत करतो?
1) बेसनगर स्तंभ शिलालेख
2) अमरावती स्तंभ शिलालेख
3) लुम्बिनी स्तंभ शिलालेख
4) बोधगया स्तंभ शिलालेख
Which among the following pillar inscription help in understanding the history of the Shunga Dynasty?
1) Besnagar pillar inscription
2) Amaravati pillar inscription
3) Lumbini pillar inscription
4) Bodhgaya pillar inscription

---

2. शुंग राजघराण्याविषयी खालील विधानांचा विचार करा.
अ) हे मौर्य घराण्याचे उत्तराधिकारी घराणे होते.
ब) दहा शुंग राजांनी एकूण 112 वर्षे राज्य केले असावे असे मानले जाते.
क) याची जागा कण्व राजघराण्याने घेतली.
पर्याय:
1) विधान अ चुकीचे आहे.
2) विधान ब चुकीचे आहे.
3) विधान क चुकीचे आहे.
4) कोणतेही विधान चुकीचे नाही.
Consider the following statements about Shunga Dynasty.
a) It succeeded Mauryan dynasty
b) Ten Shunga kings are supposed to have ruled for a total of 112 years.
c) It was replaced by Kanva Dynasty.
Answer options:
1) Statement a is incorrect
2) Statement b is incorrect
3) Statement c is incorrect
4) None of the statements are incorrect.

---

3. पुष्यमित्र शुंगविषयी खालील विधानांचा विचार करा.
अ) तो मौर्यांच्या सैन्याचा सरसेनापती होता.
ब) त्याने 36 वर्षे राज्य केले.
क) तो कालिदासाच्या मालविकाग्निमित्रम् चा नायक आहे.
ड) त्याने मौर्य राजा बृहद्रथला मारले.
इ) त्याने दोन अश्वमेध यज्ञ केले.
दिलेली कोणती विधाने बरोबर आहेत?
1) वरील सर्व
2) अ, ब, ड आणि इ
3) अ, क आणि ड
4) फक्त अ आणि क
Consider the following statements about Pushyamitra shunga
a) He was commander in chief of Mauryan Army
b) He ruled for 36 years.
c) He is the protagonist of Kalidasa's Malvikagnimitram.
d) He killed Mauryan King Brihadrath.
e) He performed two Ashvamedha Yadnya.
Which among the given statements are correct?
1) All of the above
2) a, b, d and e
3) a, c and d
4) a and c only



चाणक्य मंडल परिवार

4. खालीलपैकी कोणी शेवटचा शुंगशासक देवभूतीची हत्या करून कण्व घराण्याची स्थापना केली?
1) वासुदेव
2) अग्निमित्र
3) वायुमित्र
4) भूमिमित्र
Who among the following killed last Shunga ruler Devabhuti and established Kanva Dynesty?
1) Vasudeva
2) Agnimitra
3) Vayumitra
4) Bhumimitra

---

5. ऐहोळ प्रशस्ती ----- यांनी रचली होती.
1) गौतमीपुत्र सातकर्णी
2) रविकीर्ती
3) वसिष्ठपुत्र पुलमयी
4) यापैकी नाही
Aihole Prashasti was composed by -----.
1) Gautamiputra Satkarni
2) Ravikirti
3) Vasishthiputra Pulamayi
4) None of above

---

6. खालील प्राचीन शहरांचा उत्तरेकडून दक्षिणेकडे क्रम लावा.
अ) गांधार
ब) पांचाल
क) अवंती
ड) कोसल
इ) वत्स
1) अ, ब, क, ड, इ
2) अ, क, ड, ब, इ
3) अ, ब, ड, इ, क
4) अ, क, ड, इ, ब
Arrange the following ancient cities from North to South.
a) Gandhara
b) Panchala
c) Avanti
d) Kosala
e) Vatsa
1) a, b, c, d, e
2) a, c, d, b, e
3) a, b, d, e, c
4) a, c, d, e, b

---

7. खालील वर्णनावरून व्यक्ती ओळखा.
अ) तो स्वत:ला ‘सकलोत्तरपथनाथ’ असे म्हणत असे.
ब) त्याने ‘रत्नावली’, ‘नागानंद’ ही नाटके लिहिली.
क) तो दर पाच वर्षांनी आपली संपत्ती वाटून टाकत असे.
1) धनानंद
2) हर्षवर्धन
3) चंद्रगुप्त मौर्य
4) अजातशत्रू
Identify the personality from given description:
a) He used to call himself as ‘Sakalottarpathanath’.
b) He wrote dramas like ‘Ratnawali’ and ‘Naganand’.
c) He used to distribute all his property every five years.
1) Dhananand
2) Harshavardhan
3) Chandragupta Maurya
4) Ajatshatru



चाणक्य मंडल परिवार

8. बौद्ध परिषदा व त्यावेळचे राजे यांच्या जोड्यांचा विचार करा.

| बौद्ध परिषदा | राजे |
|---|---|
| अ) पहिली बौद्ध परिषद | अशोक |
| ब) दुसरी बौद्ध परिषद | कालाशोक |
| क) तिसरी बौद्ध परिषद | कनिष्क |

वरीलपैकी योग्य जोडी/जोड्या कोणत्या?

1) अ, ब, क  2) फक्त अ

3) फक्त ब  4) वरीलपैकी एकही नाही

Consider the following pairs of Buddhist councils and kings who were contemperary of these councils.

| Buddhist Councils | Kings |
|---|---|
| a) First Buddhist Council | Ashoka |
| b) Second Buddhist Council | Kalashoka |
| c) Third Buddhist Council | Kanishka |

Which of the above pairs is/are correct?

1) a, b, c  2) Only a

3) Only b  4) None of the above

---

9. लोकायत व आजीविका तत्त्वज्ञानामध्ये कोणता मूलभूत फरक होता?

अ) आजीविकांचा प्रारब्धावर विश्वास होता तर लोकायत त्याच्या विरुद्ध होते.

ब) आजीविकांच्या मते कोणतेही वैश्विक नियम अस्तित्वात नसतात तर लोकायतांच्या मते काही मूलभूत नियम अस्तित्वात असतात.

1) फक्त अ  2) फक्त ब

3) दोन्ही अ, ब  4) यापैकी एकही नाही

What was the fundamental difference between philosphies of Lokayatas and Ajivikas?

a) Ajivikas believed in fatalism whereas Lokayatas were against it.

b) Ajivikas noted that there are no universal laws whereas Lokayatas believed certain fundamental laws exist.

1) Only a  2) Only b

3) Both a and b  4) None of the above



चाणक्य मंडल परिवार

10. कला व भारताचा पुरातत्त्व इतिहास याच्या संदर्भात खालीलपैकी कोणत्या गोष्टी अशोकाच्या सत्ताकाळातील आहेत?

अ) धौली येथील दगडात कोरलेला हत्ती — ब) लोमस ऋषी गुहा

क) बदामी गुहा — ड) उदयगिरी गुहा

1) अ, ब — 2) क, ड

3) अ, क — 4) ब, ड

With reference to art and archaeological history of India, which of the following are associated with reign of Ashoka?

a) Rock cut elephant at Dhauli — b) Lomus Rishi caves

c) Badami caves — d) Udaygiri caves

1) a, b — 2) c, d

3) a, c — 4) b, d

---

11. गौतमबुद्धांच्या जीवनाशी संबंधित खालील जोड्यांचा विचार करा.

| घटना | ठिकाण |
|---|---|
| अ) जन्म | कुशीनगर |
| ब) ज्ञानप्राप्ती | सारनाथ |
| क) पहिले प्रवचन | बोधगया |

वरीलपैकी कोणती/त्या योग्य जोडी/ड्या आहे/त?

1) अ, ब, क — 2) फक्त ब

3) फक्त क — 4) वरीलपैकी एकही नाही.

Consider following pairs regarding Gautam Buddhas life.

| Event | Place |
|---|---|
| a) Birth | Kushinagar |
| b) Enlightment | Sarnath |
| c) First Sermon | Bodhagaya |

Which of above pairs is/are correct?

1) a, b, c — 2) Only b

3) Only c — 4) None of the above

---

12. अशोकाच्या अलाहाबाद येथील स्तंभालेखावर खालीलपैकी कोणत्या मध्ययुगीन शासकाबद्दल माहिती आढळते?

1) अलाउद्दीन खिलजी — 2) मुहम्मद बिन तुघलक

3) अकबर — 4) जहांगीर

Which of the following Medieval king's description is available on the pillar Allahabad inscription of Ashoka?

1) Allauddin Khilji — 2) Muhmmad Bin Tughlaq

3) Akbar — 4) Jahangir



चाणक्य मंडल परिवार

13. खालील जोड्यांचा विचार करा.

| महाजनपदे | राजधानी |
|---|---|
| अ) वज्झी | वैशाली |
| ब) चेदी | पोतना |
| क) अवंती | सुक्तीमती |

वरीलपैकी कोणती/त्या जोडी/जोड्या बरोबर आहे/त?

1) फक्त अ 2) ब, क
3) अ, क 4) फक्त ब

Consider the following pairs.

| Mahajanpadas | Capital |
|---|---|
| a) Vajji | Vaishali |
| b) Chedi | Potana |
| c) Avanti | Suktimati |

Which of the above pairs is/are correct?

1) Only a 2) b, c
3) a, c 4) Only b

---

14. खालीलपैकी कोणती/त्या जैन तत्त्वज्ञानातील महत्त्वाच्या संकल्पना आहेत?

अ) सर्व जग हे निर्जीव असून तो एक भ्रम आहे.

ब) जन्म व मृत्यू असे कोणतेही कालचक्र अस्तित्वात नसते, कारण सर्वजण शून्यातून येतात व शून्यात जातात.

1) फक्त अ 2) फक्त ब
3) अ, ब 4) वरीलपैकी नाही.

Which of the following was/were some of the most important ideas of Jainism?

a) The entire world is inanimate despite the contrary illusion.

b) There are no cycles of birth and death as object comes from nothing and dissolve into nothing.

1) Only a 2) Only b
3) a, b 4) None of the above.

---

15. खालीलपैकी कोणती/कोणत्या संज्ञा जैन तत्त्वज्ञानाशी संबंधित आहेत?

अ) अनुव्रत
ब) महाव्रत
क) सल्लेखना

1) अ, ब 2) फक्त क
3) ब, क 4) अ, ब, क

Which of the following terms is/are associated with Jainism?

a) Anuvrata
b) Mahavrata
c) Sallekhana

1) a, b 2) Only c
3) b, c 4) a, b, c



चाणक्य मंडल परिवार

16. खालीलपैकी कोणता समूह जैन तत्त्वज्ञानातील त्रिरत्ने दर्शवतो?
1) योग्य श्रद्धा, योग्य ज्ञान, योग्य विचार
2) योग्य विचार, योग्य कृती, योग्य आचरण
3) योग्य श्रद्धा, योग्य ज्ञान, योग्य आचरण
4) यापैकी नाही.
Which of following groups represents correct combination of Triratnas of Jainism?
1) Right Faith, Right Knowledge, Right Thoughts
2) Right Thoughts, Right Action, Right Conduct
3) Right Faith, Right Knowledge, Right Conduct
4) None of the above

---

17. खालील विधानांचा विचार करा.
अ) प्राचीन काळी वेद हे संस्कृतमध्ये लिहिले गेले.
ब) संस्कृत, पाली व प्राकृत भाषा इंडो-युरोपियन कुळातील आहेत.
क) द्रविड भाषांमधील तेलुगु भाषेत सर्वात जुने साहित्य आहे.
वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त?
1) फक्त अ    2) अ, ब
3) फक्त ब    4) ब, क
Consider the following statements.
a) The vedas in ancient times were written in Sanskrit.
b) Sanskrit, Pali and Prakrit belong to Indo-European family of languages.
c) Among Dravidian languages, Telugu has oldest literature.
Which of the above statements is/are correct?
1) Only a    2) a, b
3) Only b    4) b, c

---

18. संगम व वैदिक साहित्यासंबंधी खालील विधानांचा विचार करा.
अ) वैदिक आणि संगम साहित्य धार्मिक स्वरूपाचे आहे.
ब) संगम साहित्य लोकांच्या राजकीय व आर्थिक जीवनाविषयी कोणतीही माहिती देत नाही, जी वैदिक साहित्यातून मिळते.
वरीलपैकी कोणते/ती वाक्य/वाक्ये बरोबर आहे/त?
1) फक्त अ    2) फक्त ब
3) अ, ब दोन्ही    4) वरीलपैकी एकही नाही.
Consider the following statements with reference to Sangam and Vedic texts.
a) Both Sangam and Vedic texts are religious in nature.
b) Unlike vedic texts, Sangam texts do not provide any information on political and economic life of people.
Which of the above statements is/are correct?
1) Only a    2) Only b
3) Both a, b    4) None of the above



चाणक्य मंडल परिवार

19. प्राचीन भारतीय राजकीय इतिहासाच्या संदर्भात खालीलपैकी कोणती महाजनपदे गण किंवा संघ म्हणून ओळखली जायची?

अ) कपिलावास्तू
ब) वैशाली
क) कौशंबी
ड) कोसला
इ) अवंती

1) अ, ब
2) अ, ड, इ
3) क, ड
4) ब, इ

In the context of ancient Indian political history, which of the following Mahajanapadas was/ were identified as 'ganas' or 'sanghas'?

a) Kapilavastu
b) Vaishali
c) Kaushambi
d) Kosala
e) Avanti

1) a, b
2) a, d, e
3) c, d
4) b, e

---

20. अशोकाच्या शिलालेखांसंबंधी खालील विधानांचा विचार करा.

अ) ते अशोकाच्या धम्माविषयी व त्या नेत्याच्या अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचनांविषयी आहेत.

ब) अशोकाचे शिलालेख प्रथम जेम्स प्रिंसेपने 1837 मध्ये उलगडा करून दाखविले.

क) बाराबर गुहांमध्ये मोठे शिलालेख सापडतात.

ड) छोटे शिलालेख मोठ्या शिलालेखांनंतर कोरले गेल्याचे मानले जाते.

वरीलपैकी कोणते/ती वाक्य/वाक्ये बरोबर आहे/त?

1) ब, ड
2) अ, क
3) अ, ब, क
4) अ, ब, क, ड

Consider the following statements about the rock edicts of Ashoka.

a) They deal with Ashoka's Dhamma and instructions given to his officials.

b) The inscriptions of Ashoka were first deciphered by James Pricep in 1837.

c) Major Rock inscriptions can be found in Barabar caves.

d) The minor rock edicts are considered to be inscribed later than major rock edicts.

Which of the above statements is/are correct?

1) b, d
2) a, c
3) a, b, c
4) a, b, c, d

21. खालीलपैकी भारतातील कोणत्या ठिकाणी अशोकाचे शिलालेख सापडले आहेत?

अ) तक्षशिला | ब) कंदाहार

क) लाम्पका | ड) कौशंबी

1) अ, ब, क | 2) ब, ड

3) फक्त ड | 4) अ, क

At which of the following places in India, Mauryan inscriptions have been found?

a) Taxila | b) Kandahar

c) Lampaka | d) Kaushambi

1) a, b, c | 2) b, d

3) Only d | 4) a, c

---

22. ऋग्वेदांमधील राजांपेक्षा महाजनपदांमधील राजे वेगळे होते कारण -----.

अ) त्यांनी मोठे किल्ले बांधले.

ब) त्यांनी सैन्य बाळगले होते.

क) त्यांनी नियमित कर गोळा केला.

1) अ, ब | 2) फक्त ब

3) फक्त क | 4) अ, ब, क

The Rajas of Mahajanapadas were different from those mentioned in Rigveda, because----.

a) They built huge forts.

b) They maintained army.

c) They collected regular taxes.

1) a, b | 2) Only b

3) Only c | 4) a, b, c

---

23. प्राचीन भारतातील वैज्ञानिक प्रगतीबाबत खालील विधानांपैकी योग्य विधाने कोणती?

अ) इसवी सनाच्या पहिल्या शतकात शस्त्रक्रियेची विशेष उपकरणे वापरात होती.

ब) इसवी सनाच्या तिसऱ्या शतकात मानवी शरीरातील अवयवांचे प्रत्यारोपण करणे चालू झाले होते.

क) इसवी सनाच्या 5 व्या शतकात साईन कोन या संकल्पनेबद्दल माहिती होती.

ड) इसवी सनाच्या 7 व्या शतकात चक्रीय चौकोन ही संकल्पना माहीत होती.

1) अ, ब | 2) क, ड

3) अ, क, ड | 4) अ, ब, क, ड

With reference to the scientific progress of ancient India, which of the following statements are correct?

a) Different kinds of specialized surgical instruments were in common use by 1st century A. D.

b) Transplant of internal organs in the human body started in 3rd century A. D.

c) The concept of sine of an angle was known in 5th century A. D.

d) The concept of cyclic quadrilateral was known in 7th century A. D.

1) a, b | 2) c, d

3) a, c, d | 4) a, b, c, d

---



चाणक्य मंडल परिवार

24. योग्य जोड्या जुळवा.

| बौद्ध परिषदा | ठिकाण |
|---|---|
| i) पहिली | a) राजगृह |
| ii) दुसरी | b) पाटलीपुत्र |
| iii) तिसरी | c) वैशाली |
| iv) चौथी | d) काश्मिर |

| | i | ii | iii | iv |
|---|---|---|---|---|
| 1) | a | b | c | d |
| 2) | a | c | b | d |
| 3) | b | c | a | d |
| 4) | b | d | c | a |

Match the pairs.

| Buddhist Council | Venue |
|---|---|
| i) First | a) Rajgriha |
| ii) Second | b) Patliputra |
| iii) Third | c) Vaishali |
| iv) Fourth | d) Kashmir |

| | i | ii | iii | iv |
|---|---|---|---|---|
| 1) | a | b | c | d |
| 2) | a | c | b | d |
| 3) | b | c | a | d |
| 4) | b | d | c | a |

---

25. मौर्य साम्राज्याबद्दल खालील विधाने लक्षात घ्या.

अ) चंद्रगुप्त मौर्य हा संस्थापक राजा होता.

ब) ते पहिले होते, ज्यांच्याकडे घोडदळ, पायदळ, हत्तीदळ, रथदळ होते.

क) त्यांच्याकडे नौदलदेखील होते.

1) सर्व योग्य 2) फक्त ब, क योग्य

3) फक्त अ योग्य 4) फक्त अ, क योग्य

Consider the following statements regarding Maurya Kingdom.

a) Chandragupta Maurya was the founder King.

b) They were the first who maintained infantry, elephant, chariots and cavalry.

c) They also maintained Navy.

1) All are correct 2) Only b, c Correct

3) Only a correct 4) Only a, c Correct



चाणक्य मंडल परिवार

26) भगवान महावीरांनी सांगितलेल्या 'त्रिरत्नात' खालीलपैकी कशाचा समावेश होतो?

अ) सम्यक् दृष्टी
ब) सम्यक् वाचा
क) सम्यक् दर्शन
ड) सम्यक् ज्ञान
इ) सम्यक् चरित्र

1) अ, ब, क
2) ब, क, ड
3) क, ड, ई
4) अ, ड, ई

Which of the following is included in the 'Triratna' mentioned by Lord Mahavira?

a) Correct vision
b) Read correctly
c) Samyak Darshan
d) Samyak Gnana
e) Correct character

1) A, B, C
2) B, C, D
3) C, D, E
4) A, D, E

---

27. अयोग्य जोडी/ड्या ओळखा.

| साहित्य | लेखक |
|---|---|
| i) मुद्राराक्षस | अ) शूद्रक |
| ii) किरतार्जुनीय | ब) भारवी |
| iii) मृच्छकटिक | क) विशाखदत्त |
| iv) कामसूत्र | ड) वात्स्यायन |

1) फक्त अ, ब
2) फक्त ब, क
3) फक्त अ, क
4) फक्त अ, ड

Choose the incorrect Pair.

| Literature | Writer |
|---|---|
| i) Mudrarakshasa | a) Sudraka |
| ii) Kiratarjuniya | b) Bharavi |
| iii) Mricchakatika | c) Visakhadatta |
| iv) Kamasutra | d) Vatsyayan |

1) Only a, b
2) Only b, c
3) Only a, c
4) Only a, d

---

28. खालील विधाने लक्षात घ्या.

अ) वर्धन साम्राज्याची स्थापना हर्षवर्धनने केली.
ब) नंद घराण्याची स्थापना धनानंदाने केली.

1) दोन्ही योग्य
2) फक्त अ योग्य
3) फक्त ब योग्य
4) दोन्ही अयोग्य

Consider the following Statements.

a) Vardhan Empire was founded by Harshavardhan.
b) Nanda dynasty was established by Dhananand.

1) Both are correct
2) Only a correct
3) only b correct
4) Both are incorrect



चाणक्य मंडल परिवार

29. गाथासप्तशती हा काव्यसंग्रह कोणी लिहिला?

1) राजा सिमुक
2) राजा हाल
3) सातकर्णी-1
4) गौतमीपुत्री सातकर्णी

Who wrote the poetic anthology 'Gathasaptasati'?

1) Raja Simuk
2) Raja Hal
3) Satkarni -1
4) Gautamiputra Satkarni

---

30. खालीलपैकी कोणत्या शिलालेखात सम्राट अशोकाच्या 'धम्म'बद्दल माहिती आहे?

1) छोटे शिलालेख
2) भाब्रू शिलालेख
3) कलिंग शिलालेख
4) चौदा शिलालेख

Which of the following edicts have information about Samrat Asokas Dhamma?

1) Minor rock edicts
2) Bhabru rock edicts
3) Kalinga rock edicts
4) fourteen rock edicts

---

31. काश्मीरचा इतिहास सांगणारे 'राजतरंगिणी' हे पुस्तक कोणी लिहिले?

1) प्रवरसेन
2) कल्हण
3) कनिष्क
4) कश्यप

Rajatarangini, a book recorded the history of Kashmir, was written by?

1) Pravarsen
2) Kalhana
3) Kanishka
4) Kashyapa

---

32. 1837 मध्ये जेम्स प्रिन्सेप यांनी शोधलेल्या ब्राम्ही लिपीतील शिलालेखात कोणत्या राजाचे वर्णन 'देवानाम पिय' असे वर्णन होते?

1) अशोक
2) अकबर
3) चंद्रगुप्त मौर्य
4) विक्रमादित्य

In 1837, James Princep deciphered Brahmi script referring to a king called Devanampiya. That celebrated monarch was :

1) Ashoka
2) Akbar
3) Chandragupta Maurya
4) Vikramaditya

---

33. 'मालविकाग्निमित्र' या कालिदासाच्या नाटकातील नायक हा पुष्यमित्र शुंगाचा कोण होता?

1) मुलगा
2) नातू
3) वडील
4) भाऊ

What is the relation between the hero of 'Malvikagnimitra' of Kalidasa and Pushyamitra Shunga?

1) Son
2) Grandson
3) Father
4) Brother

---



चाणक्य मंडल परिवार

34. ॲलेक्झांडरच्या आक्रमणावेळी भारतात कोणत्या घराण्याचे राज्य होते?
1) नंद घराणे
2) शुंग घराणे
3) मौर्य घराणे
4) यांपैकी नाही.

Which of the following dynasty was ruling in India, when Alexander invaded India?
1) Nanda dynasty
2) Shunga dynasty
3) Maurya dynasty
4) None of these

---

35. योग्य विधान/ने ओळखा.
अ) मदुराई येथे आयोजित केलेल्या पहिल्या संगम परिषदेचे अध्यक्ष अगस्त्य ऋषी होते.
ब) संगम संस्कृतीत चोल, चेर, पांड्य या दक्षिणेतील संस्कृतीचे अध्ययन केले जाते.
क) 'निवेदनात्मक' व 'उपदेशपर ग्रंथ' असे संगम साहित्याचे दोन भाग मानले जातात.

1) अ, ब
2) ब, क
3) अ, क
4) सर्व बरोबर

Choose the correct sentence/s.
a) First 'Sangam Parishad' was headed by Agastya Rishi held which was in Madurai.
b) Sangam Period can be learned from study of Chola, Chera & Pandya dynasties in south.
c) 'Narrative' and 'Admonitory texts' are the two types of sangam literature.

1) a, b
2) b, c
3) a, c
4) All are correct

---

36. जोड्या जुळवा.

| (महाजनपदे) | (राजधानी) |
|---|---|
| अ) चेदी | i) अहिच्छत्र |
| ब) कुरू | ii) इंद्रप्रस्थ |
| क) पांचाळ | iii) सोत्थिवती |
| ड) मत्स्य | iv) विराटनगर |

| | अ) | ब) | क) | ड) |
|---|---|---|---|---|
| 1) | iv | iii | ii | i |
| 2) | iii | ii | iv | i |
| 3) | iii | ii | i | iv |
| 4) | i | iii | iv | ii |

Match the pairs.

| (Mahajanpadas) | (Captials) |
|---|---|
| a) Chedi | i) Ahichhatra |
| b) Kuru | ii) Indraprastha |
| c) Panchala | iii) Sothivati |
| d) Matsya | iv) Viratnagar |

| | a) | b) | c) | d) |
|---|---|---|---|---|
| 1) | iv | iii | ii | i |
| 2) | iii | ii | iv | i |
| 3) | iii | ii | i | iv |
| 4) | i | iii | iv | ii |



चाणक्य मंडल परिवार

37. अ) वर्धमान महावीरांनी सर्व इंद्रियांवर विजय मिळवला म्हणून लोक त्यांना 'जिन' म्हणू लागले.
ब) आपला उपदेश सर्वसामान्य लोकांना कळावा म्हणून त्यांनी 'पाली' या भाषेचा वापर केला.
योग्य विधान/विधाने ओळखा.

1) फक्त अ | 2) फक्त ब
3) दोन्ही योग्य | 4) दोन्ही अयोग्य

a) As Vardhaman Mahavira conquered all the senses, people started called him 'Jin'.
b) He used the 'Pali' language to make his preaching known to common people.
Identify the correct statement/statements.

1) a only | 2) b only
3) Both correct | 4) Both incorrect

---

38. 'अमित्रघात' या नावाने तो ओळखला जायचा, जैन ग्रंथात त्याला 'सिंहसेन' म्हटले गेले आहे. तो आजिविका संप्रदायाचा अनुयायी होता. तसेच त्याला 16 राज्यांचा विजेता असेही म्हणतात.
वरील वर्णन कोणत्या राजाचे आहे?

1) अजातशत्रु | 2) चंद्रगुप्त
3) बिंदुसार | 4) बिंबिसार

He was known as 'Amitraghat', He has been named as 'Sinhsen' in Jain literature. He was the follower of Ajivika philosophy. He was also knonwn as conqueror of 16 states.
Which king is described above?

1) Ajatshatru | 2) Chandragupta
3) Bindusara | 4) Bimbisara

---

39. खालीलपैकी कोणत्या ग्रंथात बौद्ध संघाच्या व्यवस्थेचे नियम सांगितले आहेत?

1) विनयपिटक | 2) सुत्तपिटक
3) अधिधम्मपिटक | 4) त्रिपिटक

Which of the following describes the monoastic 'rules of conduct' for monks and nuns?

1) Vinaya Pitaka | 2) Sutta Pitaka
3) Adhidhamma Pitaka | 4) Tri Pitaka

---

40. खालीलपैकी कोणते/ती ठिकाण/ठिकाणे भित्तिचित्र म्हणून ओळखली जातात?
अ) अजिंठा गुहा
ब) लेपाक्षी मंदिर
क) सांची स्तूप

1) अ, ब | 2) ब, क
3) फक्त अ | 4) अ, ब, क

Which of the following places are known for Mural painting?
a) Ajantha caves
b) Lepakshi Temple
c) Stupa

1) a, b | 2) b, c
3) only a | 4) a, b, c

---



चाणक्य मंडल परिवार

41. अ) अवंतीचा राजा विक्रमादित्याने इ.स. पूर्व 57 मध्ये शकांचा पराभव केला. या विजयाप्रीत्यर्थ त्याने 'विक्रमसंवत्' कालगणना सुरू केली.
ब) इ.स. 78 मध्ये मिळवलेल्या विजयाप्रीत्यर्थ शकांनी 'शक संवत' कालगणना सुरू केली.
क) 'विक्रमसंवत्' या कालगणनेचा भारत सरकारने स्वीकार केला आहे.
वरीलपैकी अयोग्य नसणारी विधाने कोणती?
1) अ, क
2) अ, ब
3) ब, क
4) वरीलपैकी सर्व
a) King Vikramaditya of Avanti defeated the Shakas in 57 BC. For this victory, he started the 'Vikramasanvat' chronology.
b) A.D. The Shakas started the 'Shaka Sanvat' chronology after their victory in 78 AD.
c) Government of India has accepted the chronology of 'Vikramasanvat'.
Which of the above statements is not incorrect?
1) a, c
2) a, b
3) b, c
4) All of the above

---

42) अयोग्य जोडी ओळखा.

| शिक्षणकेंद्र | सद्यस्थान |
|---|---|
| 1) तक्षशिला | पाकिस्तान |
| 2) वाराणसी | वारणा व असी नदीतीरावर |
| 3) नालंदा | बिहारचे पाटणा शहराजवळ |
| 4) विक्रमशिला | गुजरातमध्ये सौराष्ट्र |

Identify the incorrect pair.

| Education center | current location |
|---|---|
| 1) Taxila | Pakistan |
| 2) Varanasi | on the banks of Varana and Asi |
| 3) Nalanda | near Patna city of Bihar |
| 4) Saurashtra | in Vikramshila Gujarat |

---

43) अ) गुणाढ्य यांचा 'पैशाची' नावाच्या भाषेतील 'बृहत्कथा' हा ग्रंथ प्रसिध्द आहे.
ब) 'पंचतंत्र' या कथा विष्णुशर्मा नावाच्या पंडिताने रचल्या.
क) बौद्ध धर्मामधील जातककथा मोठ्या प्रमाणावर प्रबोधनासाठी वापरल्या गेल्या.
1) अ, ब योग्य, क अयोग्य
2) अ अयोग्य ब, क योग्य
3) सर्व योग्य
4) ब अयोग्य अ क योग्य
a) Gunadhya's book 'Brahatkatha' in the language called 'Paishachi' is famous.
b) The story 'Panchatantra' was composed by a pandit named Vishnusharma.
c) Jataka stories in Buddhism were widely used for enlightenment.
1) a, b correct, c incorrect
2) a incorrect b, c correct
3) All Correct
4) b Incorrect a c Correct

44) अ) सुश्रुत या शल्यविशारदाने लिहिलेल्या 'सुश्रुतसंहिता' या ग्रंथात विविध रोगांचे निदान व रोगांवरील उपाय यांबाबत लिहिले आहे.
ब) सुश्रुतसंहितेचे अरबी भाषेत भाषांतर 'किताब-इ-सुसुद' असे होते.
क) तो बिंबिसाराच्या दरबारात प्रसिद्ध वैद्य होता व त्याने विविध शस्त्रक्रियांचे प्रकार व अस्थिभंग यांवर उपाय यांचा सखोल अभ्यास केला होता.
अयोग्य असलेले विधान/विधाने ओळखा.
1) फक्त क
2) फक्त ब
3) फक्त अ
4) सर्व पर्याय बिनचूक

a) In the book 'Sushrutasamhita' written by Sushruta the Shalyavisharada, the various diseases, it's diagnosis and treatment of diseases was written.
b) Sushrutasamhita is translated into Arabic as 'Kitab-i-Susud'.
c) He was a famous physician in the court of Bimbisara and studied various types of surgery and remedies for bone fractures.
Identify the statement/s that are incorrect.
1) C only
2) B only
3) A only
4) All the options are correct

---

45) योग्य जोड्या जुळवा.

| अ गट | ब गट |
|---|---|
| अ) सुत्तपिटक | I) थेरवाद बौद्ध |
| ब) अभिधम्मपिटक | II) बुद्धाची शिकवण |
| क) विनयपिटक | III) बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान |
| ड) धम्म महामत्त | IV) धर्मप्रचार व नागरिकांशी संवादासाठी अशोकाने पाठविलेले संदेशक |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | II | I | IV | III |
| 2) | IV | I | III | II |
| 3) | IV | III | I | II |
| 4) | II | III | I | IV |

Match the correct pairs.

| A Group | B Group |
|---|---|
| a) Suttapitaka | I) Theravada Buddhism |
| b) Abhidhammapitaka | II) Teachings of Buddha |
| c) Vinayapitaka | III) Philosophy of Buddhism |
| d) Dhamma Mahamatta | IV) A messenger sent by Ashoka to preach the religion and communicate with the citizens |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| 1) | II | I | IV | III |
| 2) | IV | I | III | II |
| 3) | IV | III | I | II |
| 4) | II | III | I | IV |



चाणक्य मंडल परिवार

46) प्राचीन भारतातील महाजनपदांबद्दल पुढील विधाने लक्षात घ्या.

अ) 'मल्ल' हे जनपद 'गोरखपूर' भागात होते व 'कुशीनगर' ही त्याची राजधानी होती.

ब) 'कंबोज' हे जनपद ईशान्य काश्मिरमध्ये होते व 'राजापूर' ही त्याची राजधानी होती.

क) 'अवंती' हे उत्तर प्रदेशात होते व 'कपिला' ही त्याची राजधानी होती.

ड) 'पांचाल' हे माळवा प्रांतात असून त्याची उत्तरेतील राजधानी 'उज्जैन' असून दक्षिणेतील राजधानी 'माहिष्मती' होती.

योग्य नसलेली विधान/विधाने ओळखा.

1) अ, ब
2) क, ड
3) अ, ब, क
4) सर्व विधाने बिनचूक

Note the following statements about Mahajanapadas in ancient India.

a) The Janpad 'Malla' was in 'Gorakhpur' area and 'Kushinagar' was its capital.

b) The Janpad 'Kamboj' was in north-east Kashmir and 'Rajapur' was its capital.

c) 'Avanti' was in Uttar Pradesh and 'Kapila' was its capital.

d) 'Panchal' is in Malwa province and its northern capital was 'Ujjain' and its southern capital was 'Mahishmati'.

Identify the incorrect statement/statements.

1) a, b
2) c, d
3) a, b, c
4) All the statements are incorrect

---

47) चंद्रगुप्त मौर्याबाबत योग्य नसलेले विधान/ने ओळखा.

अ) मगधचा नंद राजा 'धनानंद' याच्या जुलमी-राजवटीपासून चंद्रगुप्त मौर्याने इ.स.पू. 325 मुक्त करून मगधवर सत्ता प्रस्थापित केली.

ब) सिकंदरने नेमलेल्या क्षत्रपांमधून सेल्युकस निकेटर या बॅबिलोनच्या राजाने वायव्य भारत व पंजाबवर केलेले आक्रमण चंद्रगुप्ताने यशस्वीपणे परतवून लावले व काबूल, कंदहार व हेरत हे प्रदेश त्याच्या राज्यात सामिल केले.

क) आयुष्याच्या शेवटी त्याने बौद्ध धर्माचा स्वीकार केला.

1) अ, ब
2) फक्त क
3) फक्त ब
4) सर्व विधाने योग्य

Identify the incorrect statement/s about Chandragupta Maurya.

A) From the tyrannical rule of the Nanda king 'Dhanananda' of Magadha to Chandragupta Maurya BC. 325 freed and established power over Magadha.

b) Chandragupta successfully repulsed the invasion of north-west India and Punjab by Seleucus Nicator, king of Babylon, among the satraps appointed by Alexander, and annexed the territories of Kabul, Kandahar and Herat to his kingdom.

c) At the end of his life he embraced Buddhism.

1) a, b
2) Only c
3) only b
4) All the statements are correct



चाणक्य मंडल परिवार

48) बुद्धाच्या विविध मुद्रा व त्याचा अर्थ यांच्या जोड्या लावा.

| अ गट | ब गट |
|---|---|
| अ) वरद मुद्रा | i) भीती दाखवण्याचा हावभाव |
| ब) तर्जनी मुद्रा | ii) सर्वोच्च ज्ञानप्राप्तीचा हावभाव |
| क) क्षेपण मुद्रा | iii) इच्छापूर्तीचा हावभाव |
| ड) उत्तरबोधी मुद्रा | iv) अमृत-शिंपण्याचा हावभाव |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | iii | i | iv | ii |
| 2) | iii | i | ii | iv |
| 3) | i | iii | iv | ii |
| 4) | i | iii | ii | iv |

Match the different postures of Buddha and their meanings.

| A Group | B Group |
|---|---|
| a) Varada mudra | i) Gesture of fear |
| b) Forefinger posture | ii) Gesture of supreme enlightenment |
| c) Kshepan mudra | iii) Gesture of wish fulfillment |
| d) Uttarbodhi mudra | iv) Nectar-sprinkling gesture |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| 1) | iii | i | iv | ii |
| 2) | iii | i | ii | iv |
| 3) | i | iii | iv | ii |
| 4) | i | iii | ii | iv |

---

49) योग्य विधाने ओळखा.

अ) आजच्या महाराष्ट्राचा काही भाग ‘अश्मक’ या जनपदाने व्यापला होता.

ब) जनपदांमधील ज्येष्ठ व्यक्तींची ‘गणपरिषद’ असे व सर्व जनपदांसाठी एकच सामाईक नाणी होती.

1) अ योग्य 2) ब योग्य

3) दोन्ही योग्य 4) दोन्ही अयोग्य

Identify the correct statements.

a) Some part of today's Maharashtra was covered by the Janpad 'Ashmak'.

b) There was 'Gana Parishad' for the senior persons in the Janpads and common coinage for all janpadas.

1) a is correct 2) b is correct

3) Both correct 4) Both incorrect



चाणक्य मंडल परिवार

50) अ) बौद्ध धर्मामध्ये बुद्ध, धम्म आणि संघ यांना शरण जाण्याची संकल्पना आहे. या संकल्पनेस 'त्रिशरण' असे म्हणतात.

ब) ज्यू धर्माला 'यहुदी' धर्म असेही म्हणतात, त्यांच्या प्रार्थना स्थळाला 'सिनॅगॉग' असे म्हणतात.

क) येशू ख्रिस्तांच्या 12 शिष्यांपैकी असणारे सेंट थॉमस हे इसवी सनाच्या पहिल्या शतकात केरळमध्ये आले व त्यांनी त्रिचूर जिल्ह्यातील पल्लयूर येथे इ.स. 52 मध्ये चर्चची स्थापना केली.

ड) पारशी धर्माच्या पवित्र ग्रंथाचे नाव 'अवेस्ता' आहे. हे लोक इराणच्या फार्स किंवा पार्स भागातून आले म्हणून त्यांना पारशी या नावाने ओळखले जाते.

अयोग्य विधान/विधाने ओळखा.

1) अ
2) ब
3) क
4) सर्व विधाने योग्य

a) Buddhism has the concept of surrender to Buddha, Dhamma and Sangha. This concept is called 'Trisharan'.

b) Judaism is also known as 'Yahudi', its place of worship is called 'Synagogue'.

c) St. Thomas, one of the 12 disciples of Jesus Christ, came to Kerala in the first century AD and settled in Pallayur in Trichur district in AD and a church founded in 52 AD.

d) The holy book of Zoroastrian religion is called 'Avesta'. These people are known as Parsis because they came from Fars or Pars region of Iran.

Identify the incorrect statement/statements.

1) a
2) b
3) c
4) All the statements are correct

चाणक्य मंडल परिवार